१४३२

यानपरानवरहि

तथास्तु पान ५०

# बाहुला - बाहुली

● "हा माझा बाहुला
ती तुझी बाहुली
मी देते तुला -
तू दे मला,"

●● "नको गं बाई
जमायचं नाही
तुझ्या त्या बाहुल्याला
कळत का काही?"
माझी पहा लिली
गोड तिची बोली
काळ्याभोर तिळाशी
खळी पडते गाली"

● "असूं दे असूं दे,
सांगू नको पुढे
माझ्या राजा बाहुल्याला
बसायला घोडे.

रोज नवी बग्गी
तसा मानाचा मुजरा
टपोऱ्या डोळ्यांवर
सगळ्यांच्या नजरा."

तरीसुध्दा पहा कसा .
शहाण्यासारखा वागलो
उणंदुणं सारं कसं
माझ्याच कानांने सांगलो

तुझी तर बाहुली
लबाड आहे म्हणे
पाहून माझ्या राजाला
म्हणत असते गाणे

म्हणून आलां म्हणते
जमायचंच नाही,
वरमाईचा मान मी
सोडायचीच नाही "

" असं काय करते
उगा रागे भरते

एकमेकी वाचून कधी
कुणाचे कां सरते ?

तुझा बाई बाहुला
माझ्या बाहुलीला भावला
म्हणायचं सगळ्यांना
देवच पावला.

हुंडा हुंडा दान-मान
नको घ्यायला द्यायला
या नवरा नवरीला
अंगण देउ रहायला !!

सहदेव भरवामले

५.१.८३